# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली. जि.रत्नागिरी.
# पदवीदान समारंभ-२०१९
# जाहीर सूचनापत्र

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीचा ३८ वा दीक्षांत समारंभ माहे *फेब्रुवारी /मार्च २०१९* मध्ये संपन्न होणार आहे. या समारंभात पदवी घेवू इच्छिणाऱ्या स्नातकांनी दिनांक १५ जानेवारी २०१९ पूर्वी विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठाकडे सादर करावा. अर्जाचा विहित नमूना व माहिती विद्यापीठ वेब साईट www.dbskkv.org येथे उपलब्ध आहे. तसेच विद्यापीठ कार्यालयातील उपकुलसचिव कार्यालयात व विद्यापीठाच्या अधिनस्त मान्यता असलेल्या सर्व महाविद्यालयांमध्ये विहित अर्ज नमुना कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळता उपलब्ध होवू शकेल.

विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्जासमवेत डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे. तसेच, अर्जासोबत गुणपत्रक व आधार कार्डची सत्यप्रत जोडणे बंधनकारक आहे. डिमांड ड्राफ्ट च्या मागील बाजूस डाव्या कोपऱ्यात स्वतःचे संपूर्ण नाव व विद्याशाखा लिहावी. **रोख रक्कम, आय.पी.ओ., स्विकारण्यात येणार नाहीत.** विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा पदवीदान समारंभाकरिता विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | स्नातकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणेसाठी | रू. ८००/- |
| २. | स्नातकांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणेसाठी | रू. १,०००/- |

प्रत्यक्ष आणि पोष्टाने पदवी प्रमाणपत्र मागणी करणाऱ्या स्नातकांनी पदवीदान समारंभाची तारीख कळविणेकरिता व पदवी प्रमाणपत्र पाठविणेकरिता स्वतःचा संपूर्ण पत्ता, व फोन/सेल नंबर अर्जामध्ये नमूद करावा. प्रत्यक्ष उपस्थित राहणारे विद्यार्थी काही अपरिहार्य कारणास्तव या पदवीदान समारंभास हजर राहू शकले नाहीत तर त्यांनी हा पदवीदान समारंभ संपन्न झाल्यानंतर एक महिन्याच्या आत स्वतंत्र अर्ज सादर करुन रु. २००/- मात्र शुल्क वरीलप्रमाणे डिमांड ड्राफ्टद्वारे कार्यवाही करुन भरणा करावेत. त्यानंतर पोस्टाव्दारे संबंधित विद्यार्थ्याचे पदवी प्रमाणपत्र निर्गमित करणे बाबत कार्यवाही करण्यात येईल.

सही/-

**कुलसचिव**